नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०५/२०२६ (शनिवार )**

---

## मोबाईल टॉवरचे आर. आर. युनिट (अजना) चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी अटक, १२ गुन्हे उघड, ४ आरोपी अटक एकुण २१ लाख ३७ हजरांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १४/०५/२०२६ रोजी फिर्यादी नामे पंकज दुर्गाप्रसाद तिवारी, रा. रायटाउन ०२, इसासनी, ता. हिंगणा, जि. नागपूर यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक ०३/०५/२०२६ रोजी रात्री एमआयडीसी बुटीबोरी परिसरातील एअरटेल कंपनीचे टावर वरील आरआर युनिट किंमती ४०,०००/—रुपये हे कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेला आहे. अशा रिपोर्ट वरुन पोस्टे एमआयडीसी बोरी येथे दिनांक १४/०५/२६ रोजी कलम ३०३ (२) भान्यासं अन्वये गुन्हा झाला. सदर गुन्हा उघड करण्यासाठी एमआयडीसी बोरी पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहीतीवरून नमुद आरोपींनी गुन्हा करते वेळी काळया रंगाच्या महींद्रा कंपनीची थार क्रं डि.एल ६ सीटी ८३८२ या वाहनाचा वापर केला आहे अशा मिळालेल्या माहीती वरुन बुटीबोरी एमआयडीसी परिसरात सदर वाहनाचा शोध घेतला. दिनांक २२/०५/२०२६ रोजी सदर वाहन हे समृध्दी महामार्गाकडुन सालईदाभा रोडने एमआयडीसी मध्ये येत असल्याची गोपनिय माहीती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन सदर वाहनास सालईदाभा रोडवरुन ताब्यात घेतले असता सदर वाहनात चार आरोपी मिळुन आले. **अरोपी क्रं १) अनस इरशाद मलीक, वय २३ वर्ष, रा. तेलीयान फरीदनगर, इशाकनगर, तह मोदीनगर, जि. गाझीयाबाद, उत्तर प्रदेश, २) कयुम बबलु मंन्सुरी, वय २१ वर्ष, रा. हाउस नं. ३६७, गल्ली नं. ४, हिडनविहार, मेरठ रोड, गाझीयाबाद, उत्तर प्रदेश, ३) नाजीम यामीन खान, वय २२ वर्ष ग. गढीगढाणा, औरंगाबाद, ता. मोदीनगर, जि. गाझीयाबाद, उत्तर प्रदेश, ४) इम्रान इदरीश मलीक, वय ३८ वर्ष, रा.**

**घर नं. ६५/९, कुरेशियॉन फरिदनगर, इराकनगर, ता. मोदीनगर, जि. गाझीयाबाद, राज्य उत्तर प्रदेश** यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्व सखोल विचारपूस केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले तसेच त्यांनी यापुर्वी कळमेश्वर, मौदा, हिंगणा, वर्धा, अमरावती, जलना, अकोला तसेच पांढुर्णा राज्य मध्यप्रदेश येथील मोबाईल टावरचे आरआर युनिट चोरी करुन ते नागपुर व अकोला येथुन ट्रॅव्हल्सव्दारे दिल्ली येथे पाठविल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये सिटचे मागील बाजुस मोबाईल टावरचे ५ नग आर आर युनिट (अजना) मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष १.मोबाईल टावरचे आर आर युनिट (अजना) एकुण ५ नग, प्रत्येकी किंमती ५,००,०००/—रुपये, २.मोबाईल टावर चे आर आर युनिटचे व चिपचे सुटे पार्ट, साहीत्य किंमती ५०००/—रुपये,३.महींद्रा कंपनीची थार क्रं डी एल ६ सीटी ८३८२ किंमती १५,००,०००/—रुपये, ०४. ३ नग मोबाईल किं. ३०,०००/—रुपये आणि १ नग मोबाईल किं. १,००,०००/—रुपये, ५.मोबाईल टावर वरील आर आर युनिट व त्यामधील चिप काढण्याकरीता वापरले जाणारे रिंग स्पॅनर, कटर व इतर साहित्य किंमती २,०००/—रुपये,तसेच एक रॉयल चिंतामणी ट्रॅव्हल्स अकोला येथील लगेज पाठवलेली पावती असा **एकुण २१,३७,०००/—रुपयांचा** मुद्देमाल जप्त केला आहे. **सदर आर आर युनिटचा भारतात पुनर्वापर करता येत नाही किंवा जर वापर केला तर लगेच माहिती मिळते असे संबंधित कंपनी यांनी सांगितलेले असून सदर आर आर युनीट वापर देशात किंवा विदेशात अनैतिक कामासाठी होतो किंवा कसा याबाबत नागपुर ग्रामीण पोलीस सखोल आणि साखळी पुरावे जोडुन तपास करीत आहेत.**

**उघडकीस आलेले गुन्हे**

०१. पो.स्टे एमआयडीसी बोरी अप क्रं २१०/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०२.पो.स्टें मौदा, नागपूर ग्रामीण अप क्रं ३९६/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०३. पो.स्टें कळमेश्वर, नागपूर ग्रामीण ३३९/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०४.पो.स्टें हिंगणा, नागपूर शहर अप क्रं ११३/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०५. पो.स्टें सावंगी मेघे जि. वर्धा, अप क्रं ४०९/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०६.पो.स्टें .देवळी जि. वर्धा अप क्रं ३६६/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०७.पो.स्टें बडनेरा जि. अमरावती, अप क्रं ३११/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०८.पो.स्टें नांदगाव पेठ जि. अमरावती अप क्रं १८०/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

०९.पो.स्टें जुने शहर जि. अकोला, अप क्रं ६५७/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

१० पो.स्टें बाळापूर जि. अकोला, अप क्रं ४१४/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

११.पो.स्टें जालना तालुका जि. जालना अप क्रं २९७/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं

१२.पोस्टे पांढुर्णा राज्य मध्यप्रदेश अप क्रं क्रं २२१/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं




**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस पथक**

## नागपूर ग्रामीण जिल्हयाची "ट्रेनिंग ऑफ ट्रेनर (TOT)" प्रशिक्षणात उल्लेखनीय कामगिरी; नागपूर ग्रामीण जिल्हा संघाला सर्वोत्कृष्ट संघाची ट्रॉफी

दिनांक १८/०५/२०२६ ते दिनांक २३/०५/२०२६ या कालावधीत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे येथे "ट्रेनिंग ऑफ ट्रेनर " (TOT) प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पार पडला.या प्रशिक्षणामध्ये नागपूर ग्रामीण जिल्हा, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर, मुंबई शहर, पालघर, अमरावती ग्रामीण जिल्हा आणि जालना जिल्हा अशा ६ जिल्हयातील अधिकारी आणि अंमलदारांचा संयुक्त सहभाग होता. या प्रशिक्षणात नागपुर ग्रामीण पोलीस दलाने उल्लेखनिय कामगिरी करत जिल्हयाचा मान उंचावला आहे.

**संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल "नागपूर ग्रामीण जिल्हा" संघाला सर्वोत्कृष्ट संघाबाबत ट्रॉफी प्रदान करण्यात आली. .याशिवाय सदर प्रशिक्षणात नागपुर ग्रामीण पोलीस दलातील १) कवायत प्रशिक्षक महीला पोलीस हवालदार रूपाली रामेश्वर खराटे (पाटील) ब.नं १७३९ यांनी "बेस्ट टीचिंग स्किल" मध्ये प्रथम क्रमांक, लेखी परीक्षेत द्वितीय क्रमांक तसेच "बेस्ट कॅडेट" मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला तसेच क्रं २) कवायत प्रशिक्षक पोलीस हवालदार मुकेश श्रीराम हिवाळे, बनं २०२६ यांनी लेखी परीक्षेत**

**तृतीय क्रमांक प्राप्त करून विशेष यश संपादन केले.** सदर संघाचे नेतृत्व राखीव पोलीस निरीक्षक श्री संजय शिरसागर आणि राखीव पोलीस उपनिरीक्षक संजय नन्नावरे यांनी केले. संघामध्ये पोहवा मुकेश हिवाळे बनं २०२६, पोहवा मंगेश चरडे, बनं १८२२, पोहवा मोहम्मद इलियाज, बन २०२०, पोहवा राजेश भुरे बनं १६९८, पोहवा सुजित राठोड, बनं १७२१, मपोहवा रूपाली खराटे (पाटील),बनं १७३९,मपोहवा कल्पना नलकांडे, ब.नं १७३६, मपोहवा सोनल भारती, ब.नं १७३८ आणि पोलीस अंमलदार लोमेश पारखी, बनं ११२५ यांचा समावेश होता. दिनांक २३/०५/२०२६ रोजी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे येथे मा. श्री रविंद्रसिंग परदेशी, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे यांच्या हस्ते सर्वांना बक्षीस वितरीत करण्यात आले.

**या उल्लेखनीय यशाबद्दल मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.**



# जंगल परिसरात भरधाव वाहन चालवून वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण करणारे तसेच परवानगीशिवाय ड्रोनद्वारे व्हिडीओशुटींग करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद

मा. श्री हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत देवलापार पोलीस स्टेशन हद्दीत वन्यजीव व संरक्षित जंगल परिसराच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहे.

सदर प्रकरणाची सविस्तर माहीती अशी आहे की, lifeinkamptee या इन्स्टग्राम सोशल मीडिया अकाउंट वर अपलोड करण्यात आलेल्या जंगल परीसरात शुटींग केलेल्या व्हिडीओ ची पोलीसांनी शाहनिशा केल्यानंतर सदर व्हिडीओ हे मोरगकसा तसेच चोरबाहुली जंगल परिसरातील असल्याची खात्री झाली. आरोपी क्रं १) खलफान जैन इस्तीयाक पटेल, वय १८ वर्षे आणि मोहम्मद अमान दानीश अयाज अहमद, वय २२ वर्षे, दोन्ही रा कामठी यांनी अवैधरित्या व्हिडीओ काढुन नमुद इन्स्टग्राम अकाउंट वर पोस्ट केल्याची माहीती प्राप्त झाली. वन्यजीवांचा छळ करणे तसेच विनापरवाना ड्रोनद्वारे व्हिडिओ शूटिंग केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद दोन्ही आरोपींविरूध्द दिनांक २३/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथे खालील प्रमाणे २ गुन्हे नोंदविण्यात आले.

**दिनांक १२/०५/२०२६** रोजी दोन्ही आरोपी यांनी रात्रीच्या वेळी जंगल परिसरात वाहनातून फिरून त्यांनी बॅटरीच्या प्रकाशाचा वापर करून वन्यप्राण्यांच्या हालचाली रोखण्याचा तसेच त्यांचा पाठलाग करून पकडण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले. तसेच जंगल परिसरात भरधाव वाहन चालवून वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण केल्याचे आढळले. नमुद प्रकरणी दोन्ही आरोपी यांच्या विरूध्द कलम २८१ भारतीय न्याय संहिता सहकलम वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कलम ९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.तसेच **दिनांक १५/०५/२०२६ रोजी** दोन्ही आरोपी यांनी चोरबाहुली जंगल परिसरात शासनाकडुन तसेच संबधीत विभागाकडुन कोणतीही परवानगी न घेता ड्रोन उडवून व्हिडिओ शूटिंग केली. संबंधित परिसर हा वाघ, अस्वल, बिबट्या यांसारख्या वन्यप्राण्यांच्या अधिवासाचा भाग असून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ड्रोनद्वारे शूटिंग करून शासनाच्या

आदेशांचे उल्लंघन करण्यात आल्याने नमुद प्रकरणी दोन्ही आरोपीतांना विरूध्द कलम २२३ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद, ०३ आरोपी अटक,जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २२/०५/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, जाम नदीचे पात्रात काही इसम ट्रॅक्टरमध्ये जाम नदी मधील पात्रातील रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जाम नदीचे पात्रात जावुन पाहणी केली असता वाहन क्रं १) सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम एच ४० एल ०६११ आणि वाहन क्रं २) महेन्द्रा कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम एच ४० ए ३७७४ मध्ये काही इसम रेती उत्खनन करून रेती भरत होते. वाहन क्रं १ चा चालक मुरलीधर भगवान मानेकर, वय ५४ वर्ष आणि मालक ओंकार भगवानजी मानेकर, वय ४२ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. ०३, जलालखेडा ता. नरखेड आणि वाहन क्रं २ चा चालक/ मालक भगवान किसनाजी मानमोडे, वय ३२ वर्ष, रा. खापा हे मिळुन आले. नमुद आरोपी हे जाम नदीमधील पात्रातील रेती काढुन ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष त्यांचे कडुन दोन्ही गुन्हयातील रेती व गुन्हयात वापरलेला ट्रॅक्टर ट्रॉलीसह असा एकुण ११,०६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद ट्रक्टर चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे जलालखेडा येथे अप. क्र. २९४/२६ कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं. व अप. क्र. २९५/२६ कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं. अन्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर दोन्ही गुन्हयात ०३ आरोपी अटक करण्यात आली आहे.**

## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन वडोदा :—** दिनांक २२/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीस स्टेशन येथे फिर्यादी अश्विन मनोज गजरे, वय ३५ वर्षे, रा. २/४ शासकीय नॉर्मल स्कुल, सिताबर्डी नागपुर यांनी फिर्याद दिली की, दिनांक २१/०५/२०२६ रोजी अंकित ढाबा भंडारा ते नागपुर रोड हायवे क्र ५३ येथे फिर्यादीचा भाऊ नामे आतिष मनोज गजरे, वय ३२ वर्षे, रा. नागपुर हा त्याचा मित्र निखील कृष्णा सयाम त्यांच्या सोबत मोपेड गाडी क्र एम एच ३१ वि एफ ७४७६ ने नागपुर कडे जात असता आरोपी निखील कृष्णा सयाम याने दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने चालवुन गाडीवरचे नियंत्रण सुटल्याने फिर्यादीचा भाऊ खाली पडुन मरण पावला तसेच आरोपी हा किरकोळ जखमी झाला. आरोपी निखील कृष्णा सयाम, रा. कुभांर टोली सिताबर्डी नागपुर याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन फिर्यादीच्या भावाचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वडोदा येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, २८१ भान्यासं सहकलम २८१ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक २२/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण ३२०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे गणेष सोभेलाल वंजारी, वय ३३ वर्षे, रा. वार्ड क्र.५, तारसा, ता. मौदा,याचे वर १ गुन्हा नोंद, तसेच आरोपी क्र. २) संजय रामदास तितरमारे, वय ४६ वर्ष, रा. गरदेव मोहल्ला मौदा याचे वर १ गुन्हा नोंद**, पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे लालचंद डोमाजी मानकर, वय ६६ वर्ष, रा. घोगरा, ता. नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) विकास तुलाराम वाघमारे, वय ३२ वर्ष, रा. पारधी बेडा, आसोला शिवार २) नितेश पप्प्या पवार, वय ३२ वर्ष, रा. पारधी बेडा, आसोला शिवार ३) ०२ महिला आरोपी याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी भोजराज गंगाधर कुमरे, वय ३५ वर्ष, रा. महारकूंड, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी संदीप गुंडेराव शिवरकर, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, केळवद ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ५५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ५०० लिटर मोहाफुल रसायन सडवा व इतर साहित्य असा एकुण ३२,०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८५६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २३/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८५६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ८६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३५ आरोपी अशा एकुण १९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३९ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४४ आरोपी अशा एकुण १९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने